जनसंपर्क कक्ष

23 FEB 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ रोलबॉल लीग स्पर्धेत सातारा विजेता, कोल्हापूर उपविजेता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अस्मिता रोलबॉल लीग स्पर्धेत सातारा विजेता, कोल्हापूर उपविजेता ठरला. महाराष्ट्र रोलबॉल असोसिएशन यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित अस्मिता रोलबॉल लीग स्पर्धा नुकतीच शिवाजी विद्यापीठ मैदानावर झाली.

स्पर्धेचे उद्घाटन महापौर रूपाराणी निकम यांच्या हस्ते आणि नगरसेविका माधुरी वटकर व सृष्टी जाधव यांच्या उपस्थित झाले. या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय खेळाडू सानिया शिंदे, अवनी महाडिक, धनलक्ष्मी शिंदे, अनुश्री चोडणकर, प्रणाली यादव, अनुश्री कोणे, तनिषा शेळके, समीक्षा सावंत यांचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून सन्मान झाला. स्पर्धेमध्ये १२ ते १७ वयोगटातील मुलींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. बक्षीस समारंभ उद्योजक महेश ओसवाल, सामाजिक कार्यकर्त्या मानसी कदम यांच्या हस्ते झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रोलबॉल लीग स्पर्धेत सातारा संघाने विजेते, तर उपविजेतेपद कोल्हापूर संघाने पटकावले.**

स्पर्धेत साताराच्या ताराराणी संघाची कर्णधार धनलक्ष्मी शिंदे हिच्या नेतृत्वाखाली संघाने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कोल्हापूरची नारायणी या संघाची कर्णधार अवनी महाडिक हिच्या नेतृत्वाखाली द्वितीय क्रमांक आणि कोल्हापूरची महालक्ष्मी या संघाची कर्णधार प्रेरणा येडूरकर हिच्या नेतृत्वाखाली तृतीय क्रमांक प्राप्त केला. पंच म्हणून शुभांगी कांबळे, प्रियंका पोळ, सानिया शिंदे, मानसी यांनी काम पाहिले.

SPORTS

यावेळी कोल्हापूर रोलबॉल विभाग प्रमुख पल्लवी शिंदे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक, कोल्हापूर जिल्हा ॲमॅच्युअर, रोलबॉल असोसिएशनचे सचिव अमित कुमार पाटील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक उपस्थित होते. संयोजन अपर्णा विनय महाडिक, शुभांगी कांबळे व प्रियांका पोळ यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

23 FEB 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# संशोधनासाठी निधीप्राप्ती संशोधकांच्या विश्वासार्हतेची कसोटी

## डॉ. अशोक रायचूर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ येथे विशेष कार्यशाळा : संशोधकांनी पारदर्शकता जपली पाहिजे



**जनप्रवास : कोल्हापूर**

संशोधनासाठी निधी मिळवणे ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती संशोधकाच्या कल्पकतेची, विश्वासार्हतेची आणि नियोजनक्षमतेची कसोटी असते, असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर यांनी केले. शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित विशेष कार्यशाळेत ते बोलत होते.

संशोधन प्रकल्पांसाठी निधी मिळवण्याच्या विविध संधी, त्या निधीचा पारदर्शक आणि परिणामकारक वापर तसेच संशोधनातील नैतिकता याविषयी संशोधकांना मार्गदर्शनासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी डॉ. रायचूर बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

डॉ. रायचूर म्हणाले, संशोधन प्रस्ताव तयार करताना त्यातील उद्दिष्टे स्पष्ट, समाजोपयोगी आणि नाविन्यपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे. निधी देणाऱ्या संस्था संशोधनाचा समाजावर होणारा परिणाम, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देतात. मिळालेल्या निधीचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करणे ही संशोधकाची नैतिक जबाबदारी आहे. संशोधनात कोणत्याही प्रकारची अनियमितता, माहितीचा चुकीचा वापर किंवा नैतिकतेचा भंग होऊ नये, यासाठी संशोधकांनी प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता जपली पाहिजे. संशोधनातील नितीमत्ता सांभाळल्यास संशोधनाची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढते.

डॉ. गोसावी म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात संशोधनासाठी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. मात्र, त्यासाठी संशोधकांनी दर्जेदार प्रस्ताव तयार करण्याची आणि निधीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. अशा कार्यशाळांमुळे संशोधकांना योग्य दिशा मिळते आणि विद्यापीठाच्या संशोधन दर्जात वाढ होते. संशोधनातील नैतिक मूल्यांचे पालन करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. संशोधनाची विश्वासार्हता आणि समाजातील स्वीकारार्हता टिकवण्यासाठी नैतिकता ही मूलभूत अट आहे. विद्यापीठ संशोधकांना आवश्यक मार्गदर्शन, सुविधा आणि प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध आहे.

तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. टी. ए. अभिनंदन, डॉ. विक्रम जयराम, डॉ. रोहित कुमार यांनी कार्यशाळेच्या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. कार्यशाळेला प्रा. आदित्य सधनाला, आयआयएससी-एसयूके स्पोकचे समन्वयक डॉ. सचिन रॉन्डीया हेही उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालये आणि परिसरातील विविध विद्यापीठांतील दोनशेहून अधिक प्राध्यापक, संशोधकांनी लाभ घेतला.

विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक तसेच एएनआरएफ-पेअर, आयआयएससी-एसयूके स्पोकचे प्रमुख अन्वेषक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. के.डी. कुचे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किरण पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची तांत्रिक बाजू डॉ. प्रमोद कसबे, डॉ. सुनीलकुमार निर्मळे तर स्थानिक व्यवस्थापन डॉ. सोमनाथ पवार तसेच डॉ. कविता ओझा यांनी पाहिले. प्रसिद्धी प्रमुख म्हणून डॉ. कल्याणराव गरडकर यांनी जबाबदारी पार पाडली.

भारतातील नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या महत्वाकांक्षी अशा एएनआरएफ-पेअरच्या हब अँड स्पोक उपक्रमांतर्गत, शिवाजी विद्यापीठ, देशातील आघाडीच्या अशा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळूर या हबचे स्पोक म्हणून जोडले गेले आहे. या एएनआरएफ-पेअरच्या माध्यमातूनच या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

23 FEB 2026

जनप्रवास

# नेहमी नाविन्याचा शोध घ्या : डॉ. रत्नाकर पंडित

## ग. गो. जाधव अध्यासनात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**जनप्रवास : कोल्हापूर**

पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी सतत नाविन्याचा शोध घेतला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांनी व्यक्त केले.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरु असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. डॉ. पंडित म्हणाले, पत्रकारितेचे क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. बदलत्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी नाविन्याचा ध्यास घेतला पाहिजे.

कल्पकता आणि उपक्रमशीलता यातून पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लोकोपयोगी पत्रकारिता करावी. अध्यासनाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्याचा



**कोल्हापूर : पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना डॉ. रत्नाकर पंडित.**

निर्णय यावेळी घेण्यात आला. येत्या काही दिवसांत माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेची कार्यकारिणी निवडण्यात येणार आहे.

दुपारनंतर मास कम्युनिकेशन आणि फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर, जयप्रकाश पाटील उपस्थित होते.

2 3 FEB 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# शिवाजी विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र उभारणार

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची घोषणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी व अकृषी विद्यापीठांकडे सुमारे २५ हजार एकरहून अधिक जमीन आहे. या जमिनीचा उपयोग कशा पद्धतीने करता येईल, यासाठी उच्चशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. शिवाजी विद्यापीठाने परिसरातील दोन एकर जमीन दिल्यास येत्या काळात रतन टाटा कौशल्य विकास केंद्र उभारू, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली.

विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय रोजगार मेळाव्यात ते बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले, मुख्यमंत्री पान ४ वर

## शिवाजी विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र उभारणार

(पान १ वरून)

रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत सेवा व उत्पादन क्षेत्रासाठी ३५ टक्के सबसिडीसह अनुक्रमे ५० लाख व १ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. राज्याचे परदेशात ३० कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले आहेत. त्यामुळे रोजगाराच्या हजारो संधी उपलब्ध होणार आहेत. प्रत्येक विद्यापीठाने जागा दिल्यास शासनातर्फे सुसज्ज व अद्यावत कौशल्य विकास केंद्र निश्चितपणे उभारता येईल, जेणेकरून स्थानिक पातळीवर युवक-युवतींना आवश्यक कौशल्ये प्रदान करता येतील.

### कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क स्थापन होईल

कोल्हापुरातील आयटी पार्कचा प्रश्न आता मार्गी लागला आहे. आगामी सहा महिन्यांत आयटी पार्क स्थापन होईल. यामुळेही कोल्हापूरच्या प्रगतीला हातभार लागणार असल्याचे मंत्री उदय सामंत म्हणाले.

2 3 FEB 2026
लोकमत

# ..तरच मानवी जीवन सुसह्य होईल : अतुल देऊळगावकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** देशातील सध्याचा विकास सर्वभक्षी बाजार संस्कृतीचे लक्षण असल्याने विकासाच्या संकल्पनांची पुनर्मांडणी होणे आवश्यक आहे. यासाठी पर्यावरणाचा प्रश्न जीवनवादाशी जोडला गेला तरच मानवी जीवन सुसह्य होईल, असे मत ख्यातनाम पर्यावरणतज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि हिंदी विभागातर्फे आयोजित 'साहित्य, संस्कृती,विज्ञान, माध्यमे आणि शाश्वत विकास' या विषयावरील विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अध्यक्षीय भाषण केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी परिचय करून दिला. शरद आजगेकर यांनी आभार मानले. यावेळी विनायक देसाई, शिरीष बेरी, सुरेश शिपूरकर, रावसाहेब पुजारी, राजश्री साकळे, डॉ. अविनाश भाले, डॉ. प्रकाश मुंज, डॉ.संतोष कोळेकर, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. गीता दौडमणी, डॉ. सुवर्णा गावडे, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर उपस्थित होते.

23 FEB 2026
पुढारी

# परीक्षा अर्ज भरण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे ४ मार्चपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी ४ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाने प्रसिद्ध केल्या आहेत. तथापि, काही महाविद्यालयांकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थी हितास्तव परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार विलंब शुल्कासह ६ मार्च व अतिविलंब शुल्कासह ९ मार्चपर्यंत अर्ज भरता येणार आहे. महाविद्यालय व अधिविभागांनी ५ ते १० मार्च दरम्यान विद्यापीठाकडे रक्कम जमा करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाच्या याद्या ७ ते १२ मार्चपर्यंत जमा कराव्यात, अशा सूचना परीक्षा विभागाने दिल्या आहेत.

23 FEB 2026

तरूण भारत

# तालशास्त्रातील तबला वादनाने विद्यार्थी मंत्रमुग्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित दोन दिवसीय तबला वादन कार्यशाळा उत्साहात झाली. कार्यशाळेत न्यू जर्सी (अमेरिका) येथील सूर्याक्ष देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रसिद्ध तबला वादक पं. अरविंद मुळगावकर यांचे ते शिष्य आहेत. तालशास्त्रातील बारकावे व एकल वादनाने उपस्थित रसिक आणि विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सूर्याक्ष देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना काही मूलभूत बोलपंक्ती देऊन त्यांच्याकडून सराव करून घेतला. त्यानंतर तीनताल, झपताल व मत्तताल यांमधील कायदे, रेला, रौ, लडी या संकल्पना सोदाहरण स्पष्ट केल्या. दुस्रया सत्रात तिहाईचे विविध प्रकार, तिहाई तयार करण्याची सूत्रे आणि त्यामागील विचारप्रक्रिया यावर प्रकाश टाकला. दुसऱ्या दिवशीच्या सत्रात त्यांनी 'कंठसंगीताची साथसंगत' या विषयावर गायन व तबल्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. देशपांडे यांच्या बहारदार एकल तबला वादनाने कार्यशाळेची सांगता झाली. त्यांनी तीनतालामध्ये पेशकार, कायदे, रेला आणि फरूखाबाद घराण्याच्या विविध बंदिशी सादर केल्या. आपल्या वादनाचा शेवट त्यांनी स्वतः रचलेल्या 'फर्माईशी कमाली चक्रदार'ने केला. सदर वादनासाठी नगमा साथ अमित साळोखे यांनी केली. अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. अतुल परीट यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. गिरीधर कुलकर्णी व प्रशांत देसाई यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. यावेळी संगीत क्षेत्रातील दिग्गज पं. सुधीर पोटे, पं. विनोद डिग्रजकर, डॉ. नंदकुमार जोशी, महेश देसाई, उपस्थित होते.

**▪ शिवाजी विद्यापीठात तबला वादन कार्यशाळा**

23 FEB 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
... विद्यापीठ, कोल्हापूर

# निधीप्राप्ती ही संशोधकाच्या विश्वासार्हतेची कसोटी

## डॉ. अशोक रायचूर; शिवाजी विद्यापीठात संशोधकांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधनासाठी निधी मिळवणे ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून, ती संशोधकांच्या कल्पकतेची, विश्वासार्हतेची आणि नियोजन क्षमतेची कसोटी असते, असे प्रतिपादन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर यांनी केले.



**विशेष कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर.**

संशोधन प्रकल्पांसाठी निधी मिळवण्याच्या संधी, निधीची पारदर्शकता आणि परिणामकारक वापर, तसेच संशोधनातील नैतिकता याविषयी संशोधकांना मार्गदर्शन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ येथे कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. रायचूर म्हणाले, संशोधन प्रस्ताव तयार करताना त्यातील उद्दिष्टे स्पष्ट, समाजोपयोगी आणि नावीन्यपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे. निधी देणाऱ्या संस्था संशोधनाचा समाजावर होणारा परिणाम, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देतात. मिळालेल्या निधीचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर करणे ही संशोधकांची नैतिक जबाबदारी आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, संशोधनासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांकडून निधी उपलब्ध आहे; मात्र त्यासाठी संशोधकांनी दर्जेदार प्रस्ताव तयार करण्याची आणि निधीचा परिणामकारक वापर करण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. टी. ए. अभिनंदन, डॉ. विक्रम जयराम, डॉ. रोहित कुमार यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला प्रा. आदित्य सधनाला, आयआयएससी-एसयूके स्पोकचे समन्वयक डॉ. सचिन रॉन्डीया प्रमुख उपस्थित होते.

विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. के. डी. कुचे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किरण पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनाची जाबाबदारी डॉ. प्रमोद कसबे, डॉ. सुनीलकुमार निर्मळे, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. कविता ओझा, डॉ. कल्याणराव गरडकर यांनी पार पाडली.

23 FEB 2026

पुण्यनगरी

# 'अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया' वाणिज्य क्षेत्रात महत्वाचा टप्पा : डॉ. सुरेश गोसावी

कोल्हापूर : 'अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया' हा उपक्रम वाणिज्य शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केला. ते शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाच्या अकौंटन्सी म्युझियमच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. प्रास्ताविक वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. उद्घाटन समारंभास द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाचे अध्यक्ष सी. ए. नितीन हरगुडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, संग्रहालयामध्ये भारतातील व विदेशातील लेखाशास्त्राचा इतिहास, जुन्या लेखा नोंदी, पारंपरिक पद्धती, जुनी चलन पद्धती, तसेच चार्टर्ड अकौंटंट व्यवसायाशी संबंधित माहिती सादर केलेली आहे. आभार डॉ. केदार मारुलकर यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
23 FEB 2026 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रतन टाटा कौशल्य विकास केंद्रांद्वारे कुशल मनुष्यबळ - उदय सामंत



नोकरी महामेळाव्यात बोलताना मंत्री उदय सामंत.



बेरोजगार तरुणांनी नोकरी मेळाव्यात नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला.

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** टाटा उद्योगसमूहाने सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून राज्यात कौशल्य विकास केंद्रे उभारण्यासाठी ८५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या माध्यमातून स्व. रतन टाटा कौशल्य विकास केंद्रांची उभारणी करून उद्योगांना कुशल, प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण केले जाईल. राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने दोन एकर जागा दिल्यास तेथे शासनातर्फे सुसज्ज, अद्ययावत कौशल्य विकास केंद्र उभारता येणे शक्य आहे, असे प्रतिपादन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी रविवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, खासदार धैर्यशील माने, माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे उपस्थित होते.

**सहा महिन्यात आयटी पार्क**

निवडलेल्या उमेदवारांना किमान वेतन दिले जाते का, याची खातरजमा विद्यापीठाने कंपन्यांच्या मनुष्यबळ अधिकाऱ्यांसमवेत दरमहा बैठक घेऊन करावी. आवश्यक तेथे कंपन्यांना आदेश द्यावेत, अशी सूचना करून मंत्री सामंत यांनी कोल्हापुरात येत्या सहा महिन्यांत आयटी पार्कची उभारणी होईल, असा विश्वास व्यक्त केला.

23 FEB 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा अर्जास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षातील मार्च-एप्रिल महिन्यांतील उन्हाळी सत्रामध्ये होणाऱ्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. मार्च-एप्रिल, २०२६ उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. काही महाविद्यालयांकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ मिळण्याबाबत विद्यापीठाकडे विनंती करण्यात आली होती. त्या विनंतीचा विचार करून विद्यार्थ्यांच्या हितास्तव परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये मुदतवाढ देण्यात आल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 3 FEB 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क

## उद्योगमंत्री उदय सामंत : रोजगारदात्यांनी किमान वेतनाची हमी द्यावी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : राज्य सरकारने कोल्हापूरमध्ये आयटी पार्क साकारण्यासाठी कृतिशील पावले उचलली आहेत. या क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा सुरू आहे. जागा मंजूर झाली आहे. सहा महिन्यांत येथे आयटी पार्कची स्थापना होईल, अशी ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिली.

शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय रोजगार महामेळाव्याच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक वृद्धीसाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची, तसेच कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ विकासासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सुरू असलेल्या प्रयत्नांचीही माहिती दिली. 'रोजगार मेळाव्यांमध्ये विविध उद्योग-व्यवसाय सहभागी होतात. त्यांना आवश्यक मनुष्यबळही ते निवडून घेतात.

पान ७ वर »

## कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क

» पान १ वरून

तथापि, त्या निवडलेल्या उमेदवारांना किमान वेतन देतात का, याचीही खातरजमा करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी विद्यापीठाने या कंपन्यांच्या मनुष्यबळ अधिकाऱ्यांसमवेत दरमहा बैठक घेऊन या रोजगार मेळाव्याच्या फलश्रुतीची तपासणी करावी. जे युवक स्वयंरोजगारेच्छुक आहेत, त्यांच्यासाठीही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत सेवा आणि उत्पादन क्षेत्रासाठी ३५ टक्के सबसिडीसह अनुक्रमे ५० लाख आणि १ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. नोकरी करण्याऐवजी देणारे होण्यास इच्छुकांनी या योजनेचा लाभ घ्यावा', असे आवाहन त्यांनी केले.

23 FEB 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवकांना किमान वेतनाची हमी द्या

## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे रोजगारकर्त्यांना आवाहन : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा

**रोजगार मेळाव्यांमध्ये विविध उद्योग–व्यवसायिक सहभागी होतात. मेळाव्यातून त्यांना आवश्यक मनुष्यबळही ते निवडून घेतात. तथापि, त्या निवडलेल्या युवकांना त्यांच्याकडून किमान वेतन दिले जाते का, याचीही खातरजमा करण्याची आवश्यकता आहे, असे नमूद करून रोजगारदात्यांनी किमान वेतनाची हमी सुद्धा देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले.**



कोल्हापूर : राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत. सोबत प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. ज्ञानेश्वर मुळे, खासदार धैर्यशील माने आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुभाष कोंबडे, प्रा. एन. डी. पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फौंडेशन व विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. खासदार धैर्यशील माने, माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री सामंत पुढे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या या महामेळाव्यामुळे युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. सदर कंपन्यांच्या मनुष्यबळ अधिकाऱ्यांसमवेत दरमहा बैठक घेऊन या रोजगार मेळाव्याच्या फलश्रुतीची तपासणी करावी आणि आवश्यक तेथे त्यांना योग्य निर्देश द्यावेत. जे युवक स्वयंरोजगारेच्छुक आहेत, त्यांच्यासाठीही मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत सेवा आणि उत्पादन क्षेत्रासाठी ३५ टक्के सबसिडीसह अनुक्रमे ५० लाख आणि १ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. नोकरी करण्याऐवजी देणारे होण्यासाठी इच्छुकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यंदा दाव्होस इथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने विक्रमी ३० लाख कोटी इतक्या रकमेच्या गुंतवणुकीसाठीचे सामंजस्य करार केले आहेत. मागील काही वर्षांत टाटा उद्योग समूहाने सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून राज्यात गडचिरोलीसह रत्नागिरी, कल्याण–डोंबिवली, बीड, नाशिक आदी ठिकाणी कौशल्य विकास केंद्रे उभारण्यासाठी ८५० कोटी रुपयांचा निधी दिला. प्रशिक्षित मनुष्यबळ घडविणे ही सुद्धा विद्यापीठांची जबाबदारी असल्याचे मंत्री सामंत यांनी स्पष्ट केले.

माजी परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे म्हणाले, देशात साधारणतः १० कोटी बेरोजगार आहेत. देशातील गुणवत्तावान युवा पिढीला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन केले आहे. शिक्षण, रोजगार आणि उद्योजकता विकास ही त्रिसूत्री घेऊन फौंडेशन काम करीत आहे.

डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी खासदार धैर्यशील माने, विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील, सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, संजय परमणे, जी. बी. दीक्षित उपस्थित होते.

### १७ हजार उमेदवारांची उपस्थिती

नोकरी महामेळाव्यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि स्थानिक अशा एकूण १३५ कंपन्या सहभागी झाल्या होत्या. एकूण ९००० जागांसाठी उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. मुलाखतींसाठी सुमारे १७००० उमेदवार उपस्थित होते. यामध्ये आठवीपासून ते पीएच. डी. पर्यंतच्या उमेदवारांचा समावेश होता. ऑनलाईन पद्धतीने सुमारे ६००० उमेदवारांनी नोंदणी केली असल्याची माहिती डॉ. कोंबडे यांनी दिली.

### कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क

कौशल्य विकास केंद्रांची ठिकठिकाणी उभारणी करून उद्योगांना आवश्यक कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याचे उद्दिष्ट शासन बाळगून आहे. राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने दोन एकर जागा दिल्यास त्याठिकाणी शासनातर्फे सुसज्ज आणि अद्यावत कौशल्य विकास केंद्र निश्चितपणे उभारता येणे शक्य आहे.
कोल्हापुरात सहा महिन्यात आयटी पार्क उभारू, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी दिली. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी लघुचित्रफीतीद्वारे उपस्थिती लावली.

23 FEB 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क

## उदय सामंत : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा; १७ हजारांहून अधिक उमेदवारांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापुरात सहा महिन्यांत आयटी पार्क उभारण्याची ग्वाही उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रविवारी दिली. शिवाजी विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या मेळाव्यात १३५ कंपन्यांनी भाग घेतला. ९,००० जागांसाठी १७,००० उमेदवार उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्यातर्फे आयोजित राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

ते म्हणाले, युवकांना रोजगार देताना कंपन्यांनी किमान वेतनाची हमी देणे आवश्यक आहे. राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने दोन एकर जागा दिल्यास त्याठिकाणी शासनातर्फे सुसज्ज आणि अद्यावत कौशल्य विकास केंद्र निश्चितपणे उभारता येणे शक्य आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी लघुचित्रफीतीद्वारे संदेश पाठविला. विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील, खासदार धैर्यशील माने, माजी परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे आणि प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी कौशल्याधारित मनुष्यबळाची गरज अधोरेखित केली. प्रारंभ मंत्री सामंत यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, संजय परमणे, जी. बी. दीक्षित उपस्थित होते.





शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात रविवारी मंत्री उदय सामंत यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या छायाचित्रात राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्यात ठिकठिकाणी लावलेल्या माहितीफलकावरील क्यूआर कोडद्वारे उमेदवारांना माहिती मिळत होती.

### आठवीपासून ते पीएच.डी.च्या उमेदवारांच्या मुलाखती

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहासह विविध ठिकाणी उमेदवारांसाठी २५० मुलाखत कक्ष आणि माहिती कक्षांची निर्मिती करण्यात आली. नोंदणी अर्ज भरण्यासाठी येथे बैठक व्यवस्थाही होती. या मुलाखतींसाठी १७००० उमेदवार उपस्थित होते. यामध्ये आठवीपासून ते पीएच.डी.पर्यंतच्या उमेदवारांनी मुलाखती दिल्या. ऑनलाइन पद्धतीने ६००० उमेदवारांनी नोंदणी केली होती.

**१३५** कंपन्यांचा मेळाव्यात सहभाग

**२५०** मुलाखत कक्ष आणि माहिती कक्षांची निर्मिती

**१७,०००** उमेदवारांची मेळाव्याला उपस्थिती होती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 FEB 2026 सकाळ,





शिवाजी विद्यापीठ : राज्यस्तरीय रोजगार महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत. यावेळी डावीकडून डॉ. सुभाष कोंबडे, एन. डी. पाटील, ज्योती जाधव, ज्ञानेश्वर मुळे, धैर्यशील माने, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात उमेदवारांच्या सोयीसाठी विद्यापीठ परिसरात ठिकठिकाणी माहितीफलक लावले होते. त्यावरील क्यूआर कोडद्वारे उमेदवारांनी त्यांना हव्या त्या कंपनीच्या मुलाखतस्थळाची माहिती घेतली. तिसऱ्या छायाचित्रात उमेदवारांना माहिती देण्यासाठी विविध ठिकाणी माहिती कक्षांची निर्मिती करण्यात आली.

# विद्यापीठांनी जागा दिल्यास कौशल्य केंद्र

## उद्योगमंत्री उदय सामंत : रोजगार मेळाव्याला १७ हजार उमेदवारांची उपस्थिती

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २२ : 'राज्यातील प्रत्येक विद्यापीठाने दोन एकर जागा दिल्यास त्याठिकाणी शासनातर्फे सुसज्ज आणि अद्ययावत कौशल्य विकास केंद्र निश्चितपणे उभारता येणे शक्य आहे. जेणेकरून स्थानिक पातळीवर युवक-युवतींना आवश्यक कौशल्ये प्रदान करता येतील. प्रशिक्षित मनुष्यबळ घडविणे ही सुद्धा विद्यापीठांची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंचने घेतलेल्या राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. खासदार धैर्यशील माने, माजी परराष्ट्र सेवा अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे प्रमुख उपस्थित होते.

मागील काही वर्षांत टाटा उद्योग समूहाने सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून राज्यात कौशल्य विकास केंद्रे उभारण्यासाठी ८५० कोटी रुपयांचा निधी दिला. त्या माध्यमातून रतन टाटा कौशल्य विकास केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. अशा केंद्रांची ठिकठिकाणी उभारणी करून उद्योगांना आवश्यक कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याचे उद्दिष्ट शासन बाळगून असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ऑनलाईन संवाद साधला. विद्यापीठाने इतक्या मोठ्या प्रमाणात नोकरी मेळाव्याचे आयोजन केले, याचा आनंद वाटत असून, स्थानिक युवक-युवतींना त्याचा निश्चितपणे लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'कौशल्याधिष्ठित मनुष्यबळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्राचा उद्योग विभाग प्रयत्न करीत असून, त्याचा युवकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा', असे आवाहन खासदार माने यांनी केले.


'देशातील गुणवत्तावान युवा पिढीला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन केले आहे. शिक्षण, रोजगार, उद्योजकता विकास ही त्रिसूत्री घेऊन फाउंडेशन काम करीत असल्याचे डॉ. मुळे यांनी सांगितले. विद्यापीठ विकास मंचचे प्रदेशाध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील यांनी युवा पिढीने रोजगारांसाठी आवश्यक विविध जीवनकौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन केले.

### १३५ कंपन्यांमध्ये नऊ हजार जागा

**या नोकरी महामेळाव्यामध्ये एकूण १३५ कंपन्या सहभागी झाल्या. एकूण नऊ हजार जागांसाठी उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या. त्यासाठी विविध अधिविभागांत २५० मुलाखत कक्ष निर्माण केले होते. या मुलाखतींसाठी सुमारे सतरा हजार उमेदवार उपस्थित राहिल्याची माहिती डॉ. कोंबडे यांनी दिली.**

'या महामेळाव्याला उमेदवारांचा लाभलेला प्रतिसाद लक्षणीय स्वरूपाचा आहे. मंत्री सामंत, डॉ. मुळे यांच्या मार्गदर्शनानुसार रोजगाराभिमुख पात्र उमेदवारांना आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रयत्नशील राहील,' अशी ग्वाही प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी दिली. यावेळी सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, संजय परमणे, जी. बी. दीक्षित आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज




# नाविन्याचा शोध घ्या : डॉ. रत्नाकर पंडित

## ग. गो. जाधव अध्यासनात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**

पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी सतत नाविन्याचा शोध घेतला पाहिजे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांनी व्यक्त केले.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरु असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमच्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

डॉ. पंडित म्हणाले, पत्रकारितेचे क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. बदलत्या परिस्थितीत



टिकून राहण्यासाठी नाविन्याचा ध्यास घेतला पाहिजे. कल्पकता आणि उपक्रमशीलता यातून पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक लोकोपयोगी पत्रकारिता करावी. अध्यासनाच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. येत्या काही दिवसांत माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेची कार्यकारिणी निवडण्यात येणार आहे. दुपारनंतर मास कम्युनिकेशन आणि फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. साक्षी वाघमोडे हिने सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, अनुप जत्राटकर, जयप्रकाश पाटील उपस्थित होते.